# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited-2022 'B++' (CGPA 2.96)

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: nss@sus.ac.in विस्तारित क्र.: २२७




राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा. क्र. पुअहोसोविसो/ रा.से.यो./२०२४/ 3504 दिनांक: 1 4 MAY 2024

### सन २०२२-२३ व सन २०२३-२४ राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठस्तरीय सल्लागार समिती बैठकीचे इतिवृत्त

सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाची विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.२३/०४/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये संपन्न झाली. उक्त बैठकीचे इतिवृत्त माहितीस्तव सोबत जोडून पाठवित आहे. कृपया त्याचा स्विकार व्हावा ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा. डॉ. आर. के. वडजे)
संचालक, रासेयो

प्रति,

| अ.क्र. | सदस्यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १ | मा. प्रा. प्रकाश महानवर,<br>कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | अध्यक्ष |
| २ | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब.दामा,<br>प्र-कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ३ | योगिनी घारे,<br>कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ४ | सी. ए. श्रेणिक एस. शहा,<br>वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ५ | मा.विभागीय आयुक्त,<br>आयुक्त कार्यालय, पुणे | सदस्य |
| ६ | श्री. अजय बा. शिंदे,<br>मा. सहायक कार्यक्रम सल्लागार, रा.से.यो. प्रादेशिक केंद्र, पुणे. | सदस्य |
| ७ | डॉ. निलेश पाठक, | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| | मा.राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई | |
| ८ | डॉ. जी. एस. गायकवाड,<br>मा. समन्वयक, NSS ETI, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर | सदस्य |
| ९ | डॉ. केदारनाथ काळवणे,<br>संचालक, विद्यार्थी विकास विभाग, पु.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य |
| १० | डॉ. विजय उबाळे,<br>मा. प्राचार्य, डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| ११ | डॉ. संतोष कोटी,<br>मा. प्राचार्य, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| १२ | डॉ. शिवराया आडवीतोट,<br>मा. प्राचार्य, सी.बी.खेडगीज् कॉलेज अक्कलकोट | सदस्य |
| १३ | डॉ. शिरीष भोसले,<br>मा. प्राचार्य, माऊली महाविद्यालय, वडाळा,सोलापूर | सदस्य |
| १४ | डॉ. युवराज सुरवसे,<br>छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स, सोलापूर | सदस्य |
| १५ | डॉ. सज्जन पवार,<br>शकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज | सदस्य |
| १६ | प्रथमेश गणेश सुरवसे,<br>स्वयंसेवक, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर | सदस्य |
| १७ | प्राजक्ता विजयकुमार हाविले,<br>स्वयंसेविका, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | सदस्य |
| १८ | श्री. सुहास सुर्यकांत जोशी,<br>सामाजिक कार्यकर्ता, सोलापूर | सदस्य |
| १९ | मा.कार्यकारी अधिकारी,<br>ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद, सोलापूर | सदस्य |
| २० | मा.जिल्हा दारुबंदी अधिकारी,<br>जिल्हा अधिकारी कार्यालय, सोलापूर | सदस्य |
| २१ | मा. समन्वयक,<br>जिल्हा अधिकारी कार्यालय, नेहरु युवा केन्द्र, सोलापूर | सदस्य |
| २२ | प्रा. देवानंद चिलवंत,<br>सामाजिक कार्यकर्ता, सोलापूर | सदस्य |
| २३ | डॉ. व्ही.सी. दंडे,<br>जिल्हा समन्वयक, डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| २४ | डॉ. ए. एच. बोबडे, विभागीय समन्वयक, डी. ए. व्ही. वेलणकर कॉमर्स कॉलेज, सोलापूर | सदस्य |
| २५ | डॉ. एम. एस. डिसले, विभागीय समन्वयक, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी | सदस्य |
| २६ | प्रा. ए. एम. मुंगूसकर, विभागीय समन्वयक, भारत महाविद्यालय, जेऊर | सदस्य |
| २७ | प्रा. जवाहर मोरे., विभागीय समन्वयक, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप | सदस्य |
| २८ | प्रा. डॉ.ए. एस.लोंढे, विभागीय समन्वयक,<br>ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अॅन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर अकलूज. | सदस्य |
| २९ | डॉ. एस. यु. मुजमुले,<br>विभागीय समन्वयक, यशवंतभाऊ पाटील महाविद्यालय, भोसे | सदस्य |
| ३० | प्रा. डॉ. आर. के. वडजे,<br>संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, पुं.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य-सचिव |




NAAC Accredited-2022
'B++' (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७०/७१/७२/७३/७४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: nss@sus.ac.in विस्तारित क्र.: २२७


### राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/रा.से.यो./२०२४/ दिनांक:

### सन २०२२-२३ व सन २०२३-२४ राष्ट्रीय सेवा योजना विद्यापीठस्तरीय सल्लगार समिती बैठकीचे इतिवृत्त

सन २०२२-२३ व सन २०२३-२४ विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक मा.कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.२३/०४/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद हॉलमध्ये संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| अ.क्रं | राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती | पद |
|---|---|---|
| १ | मा. प्रा. प्रकाश महानवर,<br>कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | अध्यक्ष |
| २ | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब.दामा,<br>प्र-कुलगुरु, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ३ | योगिनी घारे,<br>मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ४ | सी. ए. श्रेणिक एस. शहा,<br>मा. वित्त व लेखा अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | सदस्य |
| ५ | मा.विभागीय आयुक्त आयुक्त कार्यालय, पुणे / प्रतिनिधी<br>मा. श्री. समीर यादव, तहसिलदार सर्वसाधारण, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर | सदस्य |
| ६ | डॉ. जी. एस. गायकवाड,<br>मा. समन्वयक, NSS ETI, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर | सदस्य |
| ७ | डॉ. केदारनाथ काळवणे,<br>मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, पु.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य |
| ८ | डॉ. विजय उबाळे,<br>मा. प्राचार्य, डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| ९ | डॉ. संतोष कोटी,<br>मा. प्राचार्य, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| १० | डॉ. शिवराया आडवीतोट,<br>मा. प्राचार्य, सी.बी.खेडगीज् कॉलेज, अक्कलकोट | सदस्य |
| ११ | डॉ. शिरीष भोसले,<br>मा. प्राचार्य, माऊली महाविद्यालय, वडाळा,सोलापूर | सदस्य |
| १२ | डॉ. युवराज सुरवसे,<br>कार्यक्रम अधिकारी, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, सोलापूर | सदस्य |
| १३ | डॉ. सज्जन पवार,<br>कार्यक्रम अधिकारी, शकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १४ | प्रथमेश गणेश सुरवसे,<br>स्वयंसेवक, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर | सदस्य |
| १५ | श्री. सुहास सुर्यकांत जोशी,<br>सामाजिक कार्यकर्ता, सोलापूर | सदस्य |
| १६ | मा. समन्वयक,<br>जिल्हा अधिकारी कार्यालय, नेहरु युवा केंद्र, सोलापूर | सदस्य |
| १७ | प्रा. देवानंद चिलवंत,<br>सामाजिक कार्यकर्ता, सोलापूर | सदस्य |
| १८ | डॉ. व्ही.सी. दंडे,<br>जिल्हा समन्वयक, डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅन्ड सायन्स, सोलापूर | सदस्य |
| १९ | डॉ. ए. एच. बोबडे,<br>विभागीय समन्वयक, डी. ए. व्ही. वेलणकर कॉमर्स कॉलेज, सोलापूर | सदस्य |
| २० | डॉ. एम. एस. डिसले,<br>विभागीय समन्वयक, कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी | सदस्य |
| २१ | प्रा. ए. एम. मुंगूसकर,<br>विभागीय समन्वयक, भारत महाविद्यालय, जेऊर | सदस्य |
| २२ | प्रा. डॉ. ए. एस.लोंढे,<br>विभागीय समन्वयक, ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अ‍ॅन्ड टेक्नॉलॉजी, शंकरनगर अकलूज | सदस्य |
| २३ | डॉ. एस. यु. मुजमुले,<br>विभागीय समन्वयक, यशवंतभाऊ पाटील महाविद्यालय, भोसे | सदस्य |
| २४ | प्रा. डॉ. आर. के. वडजे,<br>संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, पु.अ.हो.सो.वि.सो. | सदस्य - सचिव |
| | **सदर बैठकीस खालील मान्यवर अनुपस्थित होते.** | |
| १ | श्री. अजय बा. शिंदे,<br>मा. सहायक कार्यक्रम सल्लागार, रा.से.यो. प्रादेशिक केंद्र, पुणे. | सदस्य |
| २ | डॉ. निलेश पाठक,<br>मा.राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो. मंत्रालय कक्ष, मुंबई | सदस्य |
| ३ | प्राजक्ता विजयकुमार हाविले,<br>स्वयंसेविका, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर | सदस्य |
| ४ | मा.कार्यकारी अधिकारी,<br>ग्रामीण पाणीपुरवठा जिल्हा परिषद, सोलापूर | सदस्य |
| ५ | मा.जिल्हा दारुबंदी अधिकारी,<br>जिल्हा अधिकारी कार्यालय, सोलापूर | सदस्य |
| ६ | प्रा. जवाहर मोरे,<br>विभागीय समन्वयक, संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप | सदस्य |

वरील अनुपस्थित सदस्यांची नोंद घेण्यात आली.

सदरील बैठकीमध्ये विषय पत्रिकेमधील खालील विषयांवर चर्चा करण्यात आली व ठराव करण्यात आले.

| | |
|---|---|
| विषय क्र.१ | दि.२५/०७/२०२२ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे. |
| ठराव | दि.२२/०७/२०२४ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला. |

| | |
|---|---|
| विषय क्र.२ | कार्यपुर्ती अहवाल वाचन करणे. |
| ठराव | दि.२२/०७/२०२४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीच्या कार्यपूर्ती अहवालाचे मा. संचालक, रासेयो यांनी वाचन केले तसेच आगामी बैठकीपासून बैठकीमध्ये झालेल्या ठरावांनुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीचा नेमका अहवाल सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
| विषय क्र.३ | सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या वर्षातील राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा आढावा वाचन करणे. |
| ठराव | सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या वर्षातील राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची सर्वानुमते नोंद घेण्यात आली. |
| विषय क्र.४ | सन २०२२-२३ मधील विद्यार्थी संख्येचा आढावा व सन २०२३-२४ मधील विद्यार्थी संख्येचा आढावा घेणेबाबत. |
| ठराव | सोलापूर जिल्ह्यामध्ये अनुसूचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांचे प्रवेश अत्यल्प असल्याने त्यांची नोंदणी पूर्ण करणे शक्य नसल्याने सदर प्रवर्गाची मंजूर विद्यार्थी संख्या कमी करून अनुसूचित जाती (SC) किंवा इतर प्रवर्गामध्ये नोंदणी करण्यास विशेष बाब म्हणून मान्यता मिळणेसाठी शासनास प्रस्ताव पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
| विषय क्र.५ | सन २०२२-२३ चे लेखे मान्यतेसाठी व सन २०२४-२५ या वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक माहितीस्तव. |
| चर्चा | १. रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमाची व त्याअनुषंगाने होणा-या खर्चाबाबत चर्चा करण्यात आली.<br>२. दरवर्षी शासनाकडून साधारणत: मार्च अखेर अनुदान प्राप्त होत असल्याने रासेयो अंतर्गत येणारे कार्यक्रम / उपक्रम राबविण्यास आर्थिक अडचण निर्माण होते असा मुद्दा रासेयो कार्यक्रम अधिकारी व विभागीय समन्वयक यांनी उपस्थित केला.<br>३. सन २०२४-२५ मधील विद्यार्थी नोंदणी प्रक्रिया पुर्ण झालेस NSS Annual Action Plan नुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत वर्षभर चालणारे विविध उपक्रम / कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी कार्यशाळेच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली.<br>४. रक्तदान शिबीराचे आयोजन करण्याबाबत चर्चा करण्यात आली.<br>५. सन २०२२-२३ चे लेखे मान्यतेसाठी व सन २०२४-२५ या वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रकाबाबत चर्चा करण्यात आली. |
| ठराव | १. रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमार्फत राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा खर्चाच्या तपशिलासह दरमहा अहवाल मागवून घेण्यात यावा तसेच १ डिसेंबर रोजीपर्यंत झालेल्या एकुण खर्चाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>२. रासेयो अंतर्गत वर्षभर राबविण्यात येणा-या नियमित कार्यक्रम / उपक्रमासाठी प्रत्यक्ष विद्यार्थी नोंदणी संख्येप्रमाणे प्रति विद्यार्थी ३६०/- प्रमाणे व विशेष शिबीरासाठी प्रत्यक्ष विद्यार्थी नोंदणीच्या ५०% विद्यार्थी नोंदणी संख्येप्रमाणे प्रति विद्यार्थी ७००/- प्रमाणे सर्व रासेयो एकक असलेल्या अनुदानित महाविद्यालयांना दरवर्षी ऑगस्ट व जानेवारी महिन्यामध्ये अग्रीम स्वरूपात विद्यापीठ फंडातून अनुदान वितरीत करण्याच्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना अनुदान वितरण व खर्चाबाबत नियमावली तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यास मा. कुलगुरू महोदय यांनी मान्यता दिली आहे. |

| | |
|---|---|
| | अ.क्र. सदस्य नाव पद<br>१ सी. ए. श्रेणीक शहा अध्यक्ष<br>२ प्राचार्य, डॉ. एस. व्ही. कोटी सदस्य<br>३ डॉ विरभद्र दंडे सदस्य<br>४ डॉ. अमोल बोबडे सदस्य<br>५ डॉ. संजय मुजमुले सदस्य<br>६ डॉ. एम. एस. डिसले सदस्य<br>७ प्रा. डॉ. राजेंद्र वडजे सदस्य-सचिव<br><br>३. NSS Annual Action Plan नुसार राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत वर्षेभर चालणारे विविध उपक्रम / कार्यक्रमाची प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांमधील मा. प्राचार्य, जिल्हा समन्वयक, विभागीय समन्वयक व कार्यक्रम अधिकारी यांना माहिती देण्यासाठी समन्वयक, ETI प्रशिक्षण, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर यांचे वर्षातून १ मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन प्रस्तुत विद्यापीठामध्ये करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>४. रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रासेयो एकक महाविद्यालय व संबंधित महाविद्यालयांच्या कक्षातील ब्लड बॅकेसोबत MoU करून घेण्यात यावे व सदरील ब्लड बॅकेच्या सहकार्याने विभागनिहाय एकत्रित रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.<br>५. सन २०२२-२३ च्या रासेयो लेखा परीक्षणास सर्वानुमते मान्यता देण्यात आली व सन २०२४-२५ रासेयो अंदाजपत्रकाची नोंद घेण्यात आली आहे. |
| मा. अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय | |
| विषय क्र.६ | रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचेकरिता MSFDA चा कार्यक्रम घेणेबाबत डॉ. व्ही. सी. दंडे, जिल्हा समन्वयक रासेयो यांनी सूचना केली. |
| ठराव | रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचेकरिता MSFDA चा कार्यक्रम घेणेसाठी प्रस्ताव पाठविण्यास मा. कुलगुरू महोदय यांनी मान्यता दिली आहे. |
| विषय क्र.७ | अप्रशिक्षीत कार्यक्रम अधिकारी यांची ETI प्रशिक्षण पुर्ण करून घेणेबाबत डॉ. व्ही. सी. दंडे, जिल्हा समन्वयक रासेयो यांनी सूचना केली. |
| ठराव | प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांतील अप्रशिक्षीत कार्यक्रम अधिकारी यांची विभागीय निहाय माहिती गोळा करून सदरची माहिती २५ मे पर्यत मा. समन्वयक ETI प्रशिक्षण, अहमदनगर कॉलेज, अहमदनगर यांना पाठविण्यात यावी अशा सूचना मा. कुलगुरू महोदय यांनी दिल्या. |
| विषय क्र.८ | रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून ३ वर्षे पुर्ण करणा-या कार्यक्रम अधिकारी यांना प्रशस्तीपत्रक देणेबाबत डॉ. व्ही. सी. दंडे, जिल्हा समन्वयक रासेयो यांनी सूचना केली. |

| | |
|---|---|
| ठराव | ०१ ऑगस्ट, २००४ पासून रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून ३ वर्षे पुर्ण करणा-या कार्यक्रम अधिकारी यांचा प्रशस्तीपत्रक देवून सत्कार करण्यासाठी संबंधित महाविद्यालयांकडून माहिती गोळा करून घेण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात यावा व त्यासाठी प्रशस्ती प्रमाणपत्राचा नमुना तयार करून कार्यक्रम अधिकारी म्हणून ३ वर्षे पुर्ण केलेल्या कार्यक्रम अधिकारी यांचे दरवर्षी प्रशस्तीपत्रक देवून सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे अशा सूचना मा. कुलगुरू महोदय यांनी दिल्या. |
| विषय क्र.९ | विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयक यांच्या मानधनात वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात यावा डॉ. व्ही. सी. दंडे, जिल्हा समन्वयक रासेयो यांनी सूचना केली. |
| ठराव | विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयक यांच्या मानधनात वाढ करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
| विषय क्र.१० | राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरासाठी लागणारे आवश्यक वस्तु खरेदी करण्याच्या मर्यादेत १०००/- वरून ५०००/- करण्याचा डॉ. एम. एस. डिसले, विभागीय समन्वयक रासेयो यांनी सूचना केली. |
| ठराव | राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयांस नियमित कार्यक्रम व विशेष शिबीरासाठी लागणारे आवश्यक वस्तु नियमित कार्यक्रम व विशेष शिबीर अनुदानातून प्रत्यक्ष खरेदी करण्याच्या मर्यादेत १०००/- वरून ५०००/- करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| विषय क्र.११ | जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक यांना ओळखपत्र देण्यात यावे डॉ. ए. एम. मुंगूसकर, विभागीय समन्वयक रासेयो यांनी सूचना केली. |
| ठराव | जिल्हा समन्वयक व विभागीय समन्वयक यांना ओळखपत्र देण्यासाठी लागणारी माहिती उपलब्ध करून घेवून संबंधितांना प्रत्यक्ष सेवा कार्यकाळापर्यंत ओळखपत्र देण्यास व त्यांचा सेवाकाळ संमाप्त झाल्यास सदरचे ओळखपत्र राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडे जमा करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. |
| विषय क्र.१२ | सन २०२४-२५ मध्ये जास्तीत जास्त वृक्षारोपण करणेबाबत प्राचार्य, डॉ. शिरीष भोसले यांनी सूचना केली. |
| ठराव | सन २०२४-२५ मध्ये रासेयो एकक असलेल्या महाविद्यालय परिसरामध्ये / दत्तक गावामध्ये जास्तीत जास्त वृक्षारोपण करून सदरील वृक्षारोपणाचे जतन करावे. जास्तीत जास्त वृक्षारोपण करणा-या महाविद्यालयांचा विद्यापीठाच्या वतीने सत्कार करण्यात येईल असे आवाहन मा. कुलगुरू महोदय यांनी केले आहे. |
| विषय क्र.१३ | रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष शिबीराकरिता लागणारे आवश्यक वस्तु खरेदी करण्याची मर्यादा १००० वरून ५००० करणेस व रासेयो एकक महाविद्यालयांना नियमित कार्यक्रम व विशेष शिबीराच्या आयोजनाकरिता विद्यापीठ फंडातून अग्रीम स्वरूपात रक्कम अदा करण्यास तसेच ३ वर्षे रासेयो कार्यक्रम अधिकारी म्हणून काम करणा-या कार्यक्रम अधिकारी यांना प्रशस्तीपत्रक देण्यास सभागृहाच्या वतीने मा. कुलगुरू महोदय यांनी मान्यता दिल्यामुळे डॉ. युवराज सुरवसे यांनी अभिनंदनाचा ठराव करण्यात यावा अशी सूचना केली. |
| ठराव | रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष शिबीराकरिता लागणारे आवश्यक वस्तु प्रत्यक्ष खरेदी करण्याची मर्यादा १००० वरून ५००० करण्यास व रासेयो एकक महाविद्यालयांना नियमित कार्यक्रम व विशेष शिबीराच्या आयोजनाकरिता विद्यापीठ फंडातून अग्रीम स्वरूपात रक्कम अदा करण्यास तसेच ३ वर्षे रासेयो कार्यक्रम |

| | |
|---|---|
| | अधिकारी म्हणून काम करणा-या कार्यक्रम अधिकारी यांना प्रशस्तीपत्रक देण्यास मा. कुलगुरू महोदय यांनी मान्यता दिली त्यामुळे सर्वानुमते अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. |

मा. डॉ. व्ही.सी. दंडे., सदस्य सल्लागार समिती, यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

प्रा. डॉ. राजेंद्र वडजे
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,
सदस्य-सचिव, रासेयो सल्लागार समिती

प्रा. प्रकाश महानवर
मा. कुलगुरू
अध्यक्ष, रासेयो सल्लागार समिती